महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ५४ /२०२३ दि. 03 /०५/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** राबोडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. ०५/०५/२०२३ ते दि. ०६/०५/२०२३ रोजी **तथागत भगवान गौतम बुध्द यांच्या २५६६ व्या जयंती** निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक जवळ शिशुज्ञान मंदिर शाळेच्या बाजूस मनोरंजनाचे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊन नागरीकांची गैरसोय होवू नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** सिव्हिल हॉस्पीटल कॉर्नर कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून डावे वळण घेवुन खोपट नाक्याचे दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे " **प्रवेश बंद**" करण्यात येते आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथुन सरळ उथळसर रोडने मिनाताई ठाकरे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना दि. ०५/०५/२०२३ रोजी दुपारी १२:०० ते दि. ०६/०५/२०२३ रोजी रात्रौ २३.४५ वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहीका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी,ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.

मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/ विशेष शाखा,ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक,ठाणे /नवी मुंबई /बृन्मुंबई महानगरपालिका.

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत :–** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :–** सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी.ग़बोडी,नौपाडा,ठाणेनगर वाहतूक उपविभाग ठाणे.